Peer Reviewed International Research Journal of Geography
Maharashtra Bhugolshastra Sanshodhan Patrika
ISSN : 0971-6785 {Impact Factor 2.561 (IIFS)} Vol. 33, No.1, Jan-Jun. 2016. pp 115 - 118

# DEVELOPMENT PROJECT AND THEIR PROBLEMS : SPECIAL REFERENCE TO SARADAR SAROVAR PROJECT

Anil M. Patil Digambar A Paradhi

**Abstract**:

The high filler Saradar Sarovar project is a largest project of Asia. It is multipurposed irrigation and power generated project of the state of Gujarat, Maharashtra, Madhya Pradesh and Rajasthan. The foundation of this project was laid in 1979 and till today it is undergoing project. The proposed planned height of this project is 138.68 meter and at present it is built upto the height of 121.92 meter. This project big are mainly laid for the water irrigation, water power generation, drinking water and agricultural development. .

A large number of population is affected by the schemes and a way of development resources of human being. A large number of villages and houses as well as agriculture land drawn by the water of such big project. If affects the lifestyle of local people who are silent victims of such project. The Government has approved such big projects for its own viewpoint mainly tribal people are deeply affected by such kind of project as a arge number of land of their is immersed into water. It also reduces the forest. In result trees which are life backbones and other natural resources is also immersed without any Compensation.

Although high filler, but Saradar Sarovar Project has deeply affected the lives of tribals, tribal displacement, loss biodiversity, immersing trees and natural resources, submerging historical and divine places – Hence in the present research paper researchers are trying to bring out the benefits and losses of Saradar Sarovar Project with micro observations.

**बीज संज्ञा :** विकास योजना, बहुउद्देशीय प्रकल्प, विस्थापन,पुनर्वसन, परिसंस्था आणि जीवन प्रणाली.

**प्रास्ताविक :**

विकास ही एक निरंतन प्रक्रिया आहे. प्रगत मानव समाजाच्या निर्मितीसाठी विकास प्रक्रिया नितांत महत्वाची आहे.आज आपला भारतदेश विकासाच्या एका विलक्षण टप्प्यावर येवून उभा आहे. तसेच आपली वाटचाल जागतिक महासत्तेच्या दिशेने चालू आहे. देशाच्या या प्रगतीच्या वाटचालीत विविध विकास योजनांचा सिंहाचा वाटा आहे. विकास योजना या मानवजातीच्या भल्यासाठी, कल्याणासाठी असतात. यांचे काही संदर्भ न्युजपेपर, पर्यावरणशास्त्र, घेतलेले आहेत.

पण सर्वच विकास योजना राबवतांना काही संवेदनशील मुद्दे हाताळावे लागतात कारण ह्या विकास योजनांना असणारा विरोध आणि वेळ प्रसंगी यातूनच संघर्षाची ठिणगी पेटते. यातुनच मग वादविवाद, विरोध, निदर्शने, आंदोलन यांना सुरूवात होते. मग सरकार व या योजनांमुळे झालेले किंवा होणारे विस्थापीत यांच्यात अनंत काळापर्यंत चालणारा संघर्ष उद्‌भवतो. काही योजना संघर्षातही तग धरून पुर्ण होतात तर काही कायमस्वरूपी बंद पडतात (होतात.) अशीच वादग्रस्त योजना म्हणजे नर्मदा नदीवर नंदुरबार जिल्हयामधील नवागांव येथे १२७६ मी. लांबीचे व १३८.६८ मीटर ऊंचीचे संपूर्ण क्रांक्रीटचे सरदार सरोवर प्रकल्प होय.

**अभ्यास क्षेत्र :**नर्मदेचे खोरे विध्य व सातपुडा पर्वतरांगामध्ये ७२°३२' ते ८१°३५' पुर्व रेखांश व २१°२०' ते २३°४५' उत्तर अक्षांश पसरले असून एकूण पाणलोट क्षेत्रफळ ९८७९६ चौ.कि. मी. आहे. यातील ८६% भुभाग

मध्ये प्रदेशाचा असून गुजरात १२% व महाराष्ट्र २ % आहे. नर्मदा नदीची एकुण लांबी १२५३ कि. मी. असून ती मध्यप्रदेश, महाराष्ट्र व गुजरात या तीन राज्यातून वाहते. नर्मदा नदी ही भारतातील पाचव्या क्रमांकाची मोठी नदी असून सर्वात मोठी पश्चिम वाहिनी आहे. नर्मदा नदीला तब्बल ४१ नद्या येवून मिळतात त्यातील २२ नद्या सातपुड्यातून तर उर्वरित विध्यंपर्वतातून वाहतात.

सातपुड्यातील अक्कलकुवा व धडगाव या दोन्ही तालुक्याच्या दरम्यानच्या ७६ कि.मी. पटयातील सरदार सरोवर प्रकल्पातील बाधीत पुनवर्सन क्षेत्र व परिसरातील लोकसंख्येचा भौगोलिक व सामाजिक अभ्यास करण्याचा प्रयत्न केला आहे.

**संशोधनाची उद्दिष्टये :**

**१) सरदार सरोवर प्रकल्पामुळे होणाऱ्या फायद्यांचा अभ्यास करणे.**

१) सातपुडयातील सर्व शेती सिंचनाखाली आणणे.
२) आदिवासी व इतर जमातीने मासेमारी बरोबरच आपले जीवन सुककर करणे.
३) प्रत्येक आदिवासीने आपल्या शेतीसाठी पाण्याचा वापर करून घेणे.
४) पिण्याचा पाण्याचा वापर करणे.

**२) सरदार सरोवर प्रकल्पामुळे निर्माण झालेल्या समस्यांचा अभ्यास करणे.**

१) या प्रकल्पामुळे आदिवासी जमातीचे पुनर्वसन मोठ्या प्रमाणात झाले.
२) आदिवासी जमातीचे शेती पाण्याखालील बुडीत झाली.
३) आदिवासी जमातीच्या रोजगारांच्य समस्या निर्माण झाल्या.
४) तेथील मुला–मुलींच्या शैक्षणिक समस्या उद्‌भवल्या.
५) तेथील आदिवासी जमातीवर आरोग्याच्या समस्या निर्माण झाल्या.

**संशोधन पध्दती :**

प्रस्तुत शोध निबंध बहुतांशी द्वितीयक स्वरूपाच्या आकडेवारीवर आधारित आहे व शोध निबांधासाठी लागणारी प्राथमिक माहिती हि प्रत्यक्ष निरीक्षण, मुलाखत व क्षेत्र भेट या माध्यमातून गोळा केलेली आहे. दुय्यम स्वरूपाची माहिती व आकडेवारी नर्मदा प्रकल्पाचे विविध कार्यालय, शासकीय संकेत स्थळे, प्रकल्प कार्यालय यांच्या माध्यमातून संकलीत केलेली आहे.

१)क्षेत्र २) निरीक्षण ३) मुलाखत ४) सर्वेक्षण

**विषय विवेचन :**

सरदार सरोवर प्रकल्प हा आशिया खंडातील सर्वात मोठा प्रकल्प म्हणून ओळखला जातो. सरदार सरोवर धरण नर्मदावर गुजरात राज्यात महाराष्ट्र व मध्यप्रदेश राज्यांच्या सीमावर्ती भागात नवागांव येथे आहे. प्रकल्पाचे भौगोलिक स्थान २१°४९‘४९ ‘‘ उत्तर अक्षांश व ७३°४४’५०’’ पूर्व रेखांश आहे. नर्मदा विकास प्रकल्पा अंतर्गत नर्मदा नदीवर ३० मोठे प्रकल्प व ३०० लघु धरणांचा समावेश आहे. यातील ३० मोठ्या धरणापैकी सरदार सरोवर सर्वात मोठे धरण आहे.

या प्रकल्पांची प्रमुख वैशिष्टये पुढील प्रमाणे.

**सरदार सरोवर प्रकल्पाची प्रमुख वैशिष्ट्ये**

| | |
|---|---|
| १ प्रकल्पाची अंदाजीत किंमत | ३९२.४ अब्ज रूपये (८ अब्ज USD) |
| २ धरणाची लांबी | १२१० मीटर |
| ३ धरणाची ऊंची (पायापासून) | १६३ मीटर |
| ४ बांधाची ऊंची (नदी पातळीपासून) | १४६.५० मीटर |
| ५ धरणापासूनचे पाणलोट क्षेत्र | ८८,००० चौ.कि. मी. |
| ६ एकुण जलसाठयाची क्षमता | ९५० MCM (७७०१७७५acre/Ft.) |
| ७ प्रत्यक्ष क्षमता | ८५० MCM (४७०२१३७acre/Ft.) |
| ८ सांडण्याची क्षमता | ३० लाख क्युरेसे |
| ९ कालव्याचे जाळे | ७५००० कि.मी. (लांबी) |
| १० जलसिचन क्षेत्र (वार्षिक) | १८लाख हेक्टर |
| ११ पिण्याचे पाणी पुरवठा | १३१ शहरे व ९६३३ खेडी (२९ कोटी लो.) |
| १२ जलविद्युत | १४५० मेगावॅट |
| १३ एकुण कर्मचारी | ४६७३ |

**स्त्रोत :** कार्यालय,सरदार सरोवर निगम कोणत्याही देशाच्या सामाजिक व आर्थिक उन्नतीमध्ये विविध विकास योजना महत्वाच्या असतात. त्याचप्रमाणे या प्रकल्पामुळे गुजरात, महाराष्ट्र, मध्यप्रदेश व राजस्थान या चार राज्याच्या विकासाला गती प्राप्त होणार आहे. याप्रकल्पाची मुख्य उद्दिष्टये जलसिंचन पिण्याचे पाणी व जलविद्यातु आहे. या प्रकल्पामुळे वरील उद्दिष्टये पुर्ण होवून त्याचे फायदे पुढील प्रमाणे–

१) सरदार सरोवर प्रकल्पामुळे शेतीला पाण्याचा उपयोग जलसिंचनासाठी करता येईल. त्यामुळे शेतीचा विकास होईल व उत्पादनात वाढ होते.

२) या प्रकल्पातून १४५० मेगावॅट वीज निर्मिती होईल. यापैकी महाराष्ट्राला २७% म्हणजे ३९२ मेगावॅट वीज मिळणार आहे आणि जलविद्युत वापरामुळे प्रदुषण होणार नाही.

३) या प्रकल्पामुळे नद्यांचे प्रवाह अडविले जात असल्यामुळे पुरानियंत्रण शक्य होते. साहाजिच पुरामुळे होणारे नुकसान टाळाता येते.

४) धरणापासून पिण्यासाठी पाण्याचा पुरवठा केला जातो.

५) या धरणापासून औद्योगिक विकासास चालना मिळते व वसाहातीतील पाण्याचा पुरवठा होतो.

६) या धरणापासून व्यापारी तत्वावर मासेमारी करता येते.

७) पर्यटन केंद्र म्हणून धरणाचा परिसर विकासित करता येतो.

८) या सरदार सरोवर प्रकल्पामुळे उजव्या कालव्याचा राजस्थान मधील अर्वषण प्रवण क्षेत्रात कृषी व्यवसाय वाढीस चालना मिळाली.

या प्रकल्पामुळे वरील उद्दिष्टये पुर्ण होवून त्याचे तोटे पुढील प्रमाणे

१) सरदार सरोवर प्रकल्प हा आशिया खंडात सर्वात मोठा प्रकल्प असून महाराष्ट्रातील बुडीत क्षेत्रातील ३३ गावांचे पुनर्वसन करण्याचे काम चालू आहे. यामुळे बाधीत लोकांचे हाल.

२) आर्थिक व सामाजिक समस्या बरोबर लोकांवर भावनात्मक आघात होतात.
३) नर्मदा खोरे प्रकल्पामुळे सुमारे २ लाख ५० हजार लोकांना स्थलांतर करावे लागले.
४) या प्रकल्पामुळे जंगलाची फार मोठ्या प्रमाणात हानी झाली. जंगले पाण्याखाली बुडतात याचाच विपरित परिणाम पर्यावरणावर होतो. अमुल्य अशा वनसंपत्ती नाश होतो.
५) वनस्पतींच्या नाशामुळे जंगलातील वन्य पशु, पक्षी व इतर सजीवांचे अस्तित्व धोक्यात येते. यामुळे जंगल परिसंस्थेला धोका निर्माण होतो.
६) या प्रकल्पामुळे कृषी योग्य जमिन पाण्याखाली बुडतात. उदा. आंध्रप्रदेशातील श्री शैलम परियोजनेमुळे ४३ हजार हेक्टर कृषी जमीन पाण्याखाली गेली.
७) धरणाच्या पाणलोट क्षेत्रात भुकंप निर्माण होण्याची शक्यता वाढते. उदा. कोयणा धरण परिसरात १० डिसेंबर १९६७ मध्ये झालेला भुकंप.
८) मोठमोठी धरणे अचानक उद्भवलेल्या आपत्तीमुळे फुटण्याची शक्यता असते. त्यामुळे मोठ्या प्रमाणात प्राणहानी वित्तहानी होऊ शकते. १९७६ साली अमेरिकेतील ण्योमंग नदीवरील ९५ मीटर उंचीचे टीटन धरण अचानक फुटून १५ अब्ज रूपयांचे नुकसान झाले होते.
९) धरणापासून शेतीला पाणी पुरवठा केला जातो परंतु अति जलसिंचनामुळे जमिनी क्षारयुक्त बनते. उदा. बिहार व उत्तर प्रदेशातील गंडळ प्रकल्प परिसरातील जमिनी क्षारयुक्त झाल्या आहेत.
१० धरणामुळे पाणी अडवल्याने मोठ्या प्रमाणात गाळाचे संचयन होते.

**निष्कर्ष :**

सर्व बाबींचा अभ्यास करू पाहाता आम्हाला असे दिसून येते की, सरदार सरोवर प्रकल्पामुळे नंदुरबार जिल्हयातील अक्कलबुवा वधडगाव या दोन्ही तालुक्यातील ७६ कि. मी पट्टयातील बाधीत ३३ गांवाचे पुनवर्सन क्षेत्र परिसरातील लोकांचा विकास कमी झालेला दिसतो. मात्र त्यांच्या बऱ्याच समस्या वाढलेल्या दिसून येतात जसे बाधीत झालेल्या लोकांच्या अडचणी म्हणजेच बोलीभाषा, राहणीमान ते रोजगारापर्यंत समस्येची जाणीव आढळून येत आहे. त्यांच्या विचारांची देवाण घेवाण, आरोग्याच्या समस्या, शैक्षणिक दृष्टया मागास असलेले गांव आढळून येतात. तरी सुध्दा अशा गंभीर परिस्थितीतून तेथून स्थलांतर व्हायला तयार नाहीत कारण त्यांच्या उपजिवीकांची साधणे नर्मदा नदीच्या परिसरातच आहे. असे पाहता 'विकास की विनाश' विशेष संदर्भ सरदार सरोवर प्रकल्पाचा अनुभव घेता येईल.

**संदर्भ :**

१) पर्यावरणशास्त्र : ए.बी.सवदी, पी.एस. कोळेकर,पान नं. २.१४
२) पर्यावरणाशास्त्र : प्रा. एस. व्ही. ढाके, प्रा. डॉ. एस. टी. इंगळे, प्रा. डॉ. व्ही. जे. पाटील, पान नं. ४७
३) माते नर्मदे – नरेंद्र दाभोळकर
४)जल आशय – राघवेंद्र कुलकर्णी,विलास पवार

***Prof. Anil M. Patil**
S.S.P.M. Arts & Sci. Mahila
Dist. Nandurbar (M.S.)
Mahavidyalay Shahada

****Dr. Digambar A. Paradhi**
N.H.College, Brhmapuri
Dist. Candrapur (M.S.)